वारसा अर्ज क्र. १८३/२०२२

**निशाणी क्र. ७१**

**<u>सा.वाला हिचा उर्वरित उलटतपास अर्जदाराचे विधीज्ञ श्री ए.बी.मोरे यांच्यामार्फत</u>**

शिवबा सोनवणे यांचा अंत्यविधी झाल्यानंतर मी नाशिक येथे निघुन गेली. त्यानंतर पोलिसांनी काय तपास केला याबाबत मला माहिती नाही. पोलिसांनी मला बोलाविले नव्हते. पोलिसांनी मला का बोलाविले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. माझ्या लग्नाच्या दिवशी आम्ही लग्न लावण्याकरिता ब्राम्हण लावला होता. आमच्या मध्ये लग्न झाल्यानंतर सप्तपदी करत नाही तसेच अग्निला देखील फेरे मारले जात नाही. ज्या ब्राम्हणाने आमचे लग्न लावले मला त्यांचे नाव सांगता येणार नाही. माझ्या लग्नाची विवाह नोंद केलेली नाही. ज्या ब्राम्हणाने आमचे लग्न लावुन दिले होते त्याचा आमचे लग्न लावत असतांनाचा फोटो माझ्याकडे उपलब्ध असुन तो मी दाखल करु शकते. ते ब्राम्हण आता हयात नाहीत. शिवबा सोनवणे यांचा अंत्यविधी झाल्यानंतर मी परत दवाखान्यात गेली नाही. हे मला माहिती नाही की, शिवबा सोनवणे यांचा दवाखान्याचा खर्च रु.६,५०,०००/— इतका आला होता. सदरचा खर्च कोणी भरला हे मला सांगता येणार नाही. त्यांचे ऑपरेशन कोणत्या डॉक्टरने केले हे मला सांगता येणार नाही. मुंबई नाका पोलिस स्टेशन मध्ये मला बोलाविले होते. मी तेथे हजर झाले नव्हते. मला मुंबई नाका पोलिस स्टेशन येथे कोणी बोलाविले त्याचे नाव अथवा फोन नं. मला सांगता येणार नाही. मी मुंबई नाका पोलिस स्टेशन येथे गेली नसल्यामुळे कोणी फिर्याद दिली हे मला सांगता येणार नाही. शिवबा सोनवणे यांचे शवविच्छेदन झाले किंवा नाही ही बाब मला सांगता येणार नाही. संगिता शिवबा सोनवणे यांनी वारस दाखला मिळण्याकरिता न्यायालयात अर्ज केल्याची बाब मला कशी कळाली हे मी सांगु शकत नाही. आम्ही सटाणा न्यायालयात वारस दाखल काढण्याकरिता आलो होतो सदर अर्जाचा क्र. ४३/२०२३ असा आहे. सदरचा अर्ज आजरोजी न्यायालयात प्रलंबित आहे. सदर अर्जामध्ये पाच जणांची नावे टाकलेली आहेत. सदर पाचही लोकांची नावे तहसिल कार्यालयातुन काढलेल्या वारस दाखल्या मध्ये नमुद आहेत. आता मला निशाणी ५८ वरील तहसिलदार कार्यालय यांनी दिलेले वारसा प्रमाणपत्र दाखविण्यात आले. सदर वारसा प्रमाणपत्रामध्ये गिताबाई रामसिंग सोनवणे यांचे नाव नमुद नाही. त्यांचे नाव सदर वारस प्रमाणपत्रामध्ये मुद्दामुन टाकण्यात आले नाही. त्यांचे नाव सदर वारस प्रमाणपत्रामध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या वारस प्रमाणपत्रासाठी मी शंभर रु.च्या बॉडवर मिना शिवबा, किरण शिवबा, संदिप शिवबा आणि रोहन शिवबा या व्यतिरीक्त दुसरे कोणीही कायदेशीर वारस नाही असे नमुद केले आहे. सन २००० सालापासून मी अशोका इंग्लिश मेडिअम स्कुल येथे नोकरीस आहे. हे

म्हणणे खरे नाही की, नोकरी असल्यामुळे माझे सारदे येथे येणे—जाणे होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नोकरीला असल्याने माझ्या मुलांचे शिक्षणपाणी व्यवस्थित चालु होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जेथे राहते तेथे माझे दिर, जेठ, भाची येत नव्हते. ते माझ्याकडे कधी यायचे हे मला सांगता येणार नाही. संगिता शोभा सारदे येथे राहतात याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवबा सोनवणे यांच्या नोकरी दरम्यान कोठे कोठे बदल्या झाल्या हे मला सांगता येणार नाही. सदरच्या बदल्या कोणासाली झाल्या हे मला सांगता येणार नाही. शिवबा सोनवणे यांचे वरिष्ठ अधिकारी यांची नावे मला सांगता येणार नाही तसेच त्यांच्या कार्यालयात मी कधीही गेलेली नाही. शिवबा सोनवणे यांचे काका पिंपळगांव येथे राहतात. नाशिक एकलारे येथे शिवबा यांचे कोणते काका राहतात हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शिवबा रामसिंग सोनवणे यांची पत्नी नाही तसेच मी अभिलेखावर दाखल केलेले सर्व दस्त हे खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, संगिता शिवबा ही न्यायालयात दाखल केलेल्या अर्जाच्या बदल्यात मी दुसरा खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**समक्ष**

UDAY PRAKASH HINGMIRE

Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2025.01.01 17:04:16 +0530

**( यु.पी.हिंगमिरे )**
**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**सटाणा**

**दिनांक :—०१/०१/२०२५.**
**ठिकाण :— सटाणा.**